SEAGULL JOURNALS
A Peer-Reviewed International Multidisciplinary Research
ISSN : 2584-1963 (Approved)

# शेतकरी उत्पादक कंपनीची शेतकऱ्यांच्या सामाजिक-आर्थिक विकासातील भूमिका

**संशोधक विद्यार्थी**

ऋषिकेश सर्जेराव अंबुरे.

समाजशास्त्र विभाग.

**संशोधन मार्गदर्शक**

डॉ. विठ्ठल भीमराव मातकर

सहाय्यक प्राध्यापक ,

समाजशास्त्र विभाग,

प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय,

नेकनुर, जि.बीड.

## गोषवारा

भारतातील शेतीक्षेत्रात अल्पभूधारक व सीमांत शेतकऱ्यांचे प्रमाण मोठे आहे. उत्पादन खर्चातील वाढ, बाजारभावातील चढउतार, मध्यस्थांवरील अवलंबित्व, साठवणूक व प्रक्रिया सुविधांची कमतरता आणि बाजारमाहितीचा अभाव यांमुळे शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचा अपेक्षित मोबदला मिळण्यात अडचणी येतात. या पार्श्वभूमीवर शेतकरी उत्पादक कंपनी (Farmer Producer Company—FPC) ही सामूहिक कृतीवर आधारित महत्त्वाची संस्थात्मक व्यवस्था ठरते. शेतकरी एकत्र येऊन निविष्ठांची सामूहिक खरेदी, उत्पादनाचे नियोजन, तांत्रिक मार्गदर्शन, सामूहिक विक्री, प्राथमिक प्रक्रिया, मूल्यवर्धन, साठवणूक आणि बाजारपेठेशी थेट जोडणी करू शकतात.

प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये शेतकरी उत्पादक कंपनीचा शेतकऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक विकासातील सहभाग समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून स्पष्ट करण्यात आला आहे. अभ्यासासाठी दुय्यम साहित्य, शासकीय अहवाल, संस्थात्मक प्रकाशने व उपलब्ध संशोधनाचा उपयोग करण्यात आला आहे. सामाजिक पातळीवर सामूहिकता, नेतृत्व, निर्णयप्रक्रियेत सहभाग व संस्थात्मक जाणीव वाढण्यास FPC मदत करू शकते; तर आर्थिक पातळीवर बाजारपेठेतील प्रवेश, निविष्ठा खर्चातील बचत, मूल्यवर्धन आणि सौदेबाजीची क्षमता वाढण्याच्या संधी निर्माण होतात. तथापि, व्यावसायिक व्यवस्थापनाचा अभाव, कार्यभांडवलाची कमतरता, सदस्यांचा अपुरा सहभाग आणि बाजारातील स्पर्धा ही प्रमुख आव्हाने आहेत.

## महत्त्वाचे शब्द

शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी उत्पादक संघटना, सामाजिक विकास, आर्थिक विकास, सामूहिक कृती, कृषी बाजारपेठ, मूल्यसाखळी, शेतकरी सक्षमीकरण, ग्रामीण विकास.